माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००११४

अपिलार्थी श्री. विरेंद्रसिंह वीणा भोजराजसिंह वाघेला

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
माहिम विभाग, माहिम पोलीस ठाणे आवार, मुंबई-४०० ०१६

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-५)
सागरी पोलीस ठाणे, २ रा माळा, माहिम रेती बंदर,
माहिम डेपो समोर, मुंबई ४०० ०१६.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
१५.०९.२०२५	०५.११.२०२५	१६.१०.२०२५	०३.११.२०२५

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये समाधान झालेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.११.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०३.११.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १५.०९.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "मी केलेली कंप्लेट अर्ज ०४.०१.२०२५ रोजी विरुध्द केलेली कार्यवाही आजरोजी पर्यंत निरीक्षणासाठी वेळ देण्यात यावे.*

(२) कंप्लेट विरूध्द तपासणीसाठी कार्यवाही मुमेंट रजिस्टर वर नमूद माहितीची निरीक्षण

(३) इन्वेस्टिगेशन ऑफिसर समाधान उगले दि. ०१.०१.२०२५ ते १५.०९.२०२५ पर्यंत इन्वेस्टिगेशन ऑफिसर समाधान उगले यांची हजेरी पटाची माहितीची प्रमाणित प्रत द्यावी.

(४) निरीक्षण करताना हवी असलेली माहिती जागावर पैसे भरून हवी असलेली माहिती धारा २(J) (१) (२) (४) तहत इलेक्ट्रोनिक स्वरूप प्रमाणित प्रत द्यावी."

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.११.२०२५ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (१) बाबत कळविले की, अर्जदार यांनी मागणी केलेली माहितीच्या प्रती सोबत जोडण्यात आलेली आहेत.
मुद्दा क्र. (२) व (४) बाबत कळविले की, अर्जदार यांना कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही.
मुद्दा क्र. (३) बाबत कळविले की, अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती जी माहिती प्रकट करणे हे व्यापक

..२/-

लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी माहिती, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशिल यासंबंधातील माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम ८ (१) (त्र) नुसार नाकारण्यात येत आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १६.१०.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.११.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांचे माहितीप्रमाणे त्यांचे खोलीमध्ये राहणारे श्री. कांतीलाल रावल यांनी त्यांचे जन्मदाखल्यामध्ये फेरफार करुन चुकीचा पत्ता नमुद केला. म्हणून पोलीस ठाणे येथे तक्रार केली तरी संबंधीत पोलीसांनी काही कार्यवाही केलेली नाही व संबंधीतांनी फेरफार केलेले जन्मदाखल्याचे आधारे विभिन्न शासकीय दाखले तयार केले व वीजजोडणी घेतलेली आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयात विचारणा केल्यावर त्यांनी दि. ०९.०५.२०२५ रोजी कळविले की, श्री. कांतीबाई विठ्ठलदास रावल यांच्या अभिलेखाप्रमाणे सदर जन्मदाखल्यात फेरफार न झाल्याचे निदर्शनास येते व त्याप्रमाणे अपिलार्थींना उत्तर देण्यात आले आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

७. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या अनुषंगाने संबंधीत नस्तीचे निरीक्षण देण्यात आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांची माहिती अर्जातील मुद्दा क्र. ४ बाबत स्पष्ट नाही तरी संबंधीत अभिलेख अपिलार्थींना उपलब्ध करुन देण्यास तयार आहे.

८. अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान केलेल्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपिलार्थींना सदर प्रकरणाशी संबंधीत अभिलेख निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा व त्यापैकी अपिलार्थींना हवी असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.

२) अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

15-10-2026

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६